***मंत्रिमंडळ निर्णय :** दिनांक :- २ जून, २०१०

## आदिवासी गोवारी शहीद स्मृती शेळी संस्थेचा प्रकल्प अहिल्यादेवी महामंडळाकडे वर्ग करण्याचा निर्णय

मुंबई, दि. २ : नागपूर येथील दीड कोटी रुपयांचा आदिवासी गोवारी शहीद स्मृती शेळी व पशुपालन प्रकल्प पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी मर्यादित विकास महामंडळ-गोखले नगर यांच्याकडे वर्ग करण्यात येईल, असा निर्णय आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयामुळे आता हा प्रकल्प या महामंडळामार्फत चालविला जाईल. बँकेचे कर्ज व व्याजाच्या रकमेची परतफेड शासनामार्फत करण्यात येईल. शासनाचे जे भागभांडवल होते ते अनुदान स्वरुपात रुपांतर केले जाईल. गोवारी समाजाचे जे भागभांडवलधारक होते त्यांनी जमा केलेल्या भागभांडवलाची रक्कम दुपटीने अदा केली जाईल. संस्थेने प्रकल्पासाठी नेमलेले कर्मचारी महामंडळाकडे वर्ग करण्यात येतील. उच्च न्यायालयाकडे हे प्रकरण प्रलंबित असल्याने उच्च न्यायालयाच्या निदर्शनास हा निर्णय आणून दिला जाईल आणि त्यानंतर शासन निर्णय निर्गमित केला जाईल.

ooooooo

## माजी उपराष्ट्रपती शेखावत आणि प्रा. प्रधान यांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्रध्दांजली

मुंबई, दि. २ : देशाचे माजी उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत आणि ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. ग. प्र. प्रधान यांच्या निधनाबद्दल राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी हा शोकप्रस्ताव मांडला.

---------

## राज्यातील १८३१ गावे आणि १२१४ वाड्यात टँकरने पाणीपुरवठा

मुंबई, दि. २ : राज्यामध्ये एकूण १ हजार ८६७ शासकीय, तसेच खासगी टँकर्सद्वारे १ हजार ८३१ गावात आणि १ हजार २१४ वाड्यात पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सर्वात गंभीर टंचाईची परिस्थिती औरंगाबाद विभागात असून तेथे १ हजार ९५ टँकर्सद्वारे ७६१ गावात व ३६५ वाड्यात पाणीपुरवठा करण्यात येत आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ही माहिती आज देण्यात आली.

अमरावती विभागात देखील पाणीटंचाई गंभीर असून तेथे ४७३ टँकर्सद्वारे ४९० गावे व ३४ वाड्यांमध्ये पाणीपुरवठा करण्यात येत आहे. मागील वर्षाच्या तुलनेत राज्यातील सरासरी आकडेवारीत जरी राज्याची परिस्थिती चांगली दिसत असली तरी औरंगाबाद विभागात मागील वर्षात १ हजार ४५ टँकर्स चालू होते तेथे सध्या १ हजार ९५ टँकर्स चालू आहेत. २९ मे २०१० रोजीची ही आकडेवारी आहे.

### जलाशयातील पाणी साठा

राज्यात ३१ मे २०१० रोजीचा पाणीसाठा ५ हजार ६६२ दशलक्ष घनमीटर असून तो मागील वर्षात ४ हजार ८४६ दशलक्ष घनमीटर साठा होता. मराठवाड्यात आजचा जलसाठा ४९९ दशलक्ष घनमीटर एवढा आहे. चालू वर्षी तो १७४ दशलक्ष घनमीटरएवढा कमी झाला आहे.

**. . . २/-**

**मंत्रिमंडळ निर्णय :**

## ग्रामीण रोजगार हमी योजना

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत सुरू असलेल्या कामांवर २९ मे २०१० रोजी संपलेल्या आठवड्यामध्ये मजूर उपस्थितीमध्ये ४१ हजारांची घट झाली आहे. चालू आठवड्यात संपूर्ण राज्यात महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत एकूण ६ हजार २७३ कामे चालू असून त्यावर २ लाख ५ हजार ७०१ मजूर उपस्थिती आहे.

संपूर्ण राज्यामध्ये १ लाख १८ हजार ५५३ कामे शेल्फवर असून यामध्ये मजूर क्षमता ९३.०६ लाख एवढी आहे. १ लाख १८ हजार ५५३ शेल्फवरील कामांपैकी ८६ हजार ७६८ कामे ग्रामपंचायतीकडे आणि उरलेली ३१ हजार ८८५ कामे इतर यंत्रणेकडे आहेत.

००००००

## रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळयाला मुख्यमंत्र्यांच्या प्रयत्नांनंतर केंद्राची परवानगी

मुंबई दि.२ : रायगडावर ६ जून २०१० रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३३६ वा राज्याभिषेक सोहळा साजरा करण्यास केंद्र शासनाने परवानगी दिली आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी पंतप्रधान कार्यालयाशी संपर्क साधून सविस्तर चर्चा केली. पूर्वी पुरातत्व विभागाचे अधिक्षक राज्याभिषेक सोहळयाच्या कार्यक्रमास परवानगी देत असत. मात्र, प्राचीन स्मारके व अवशेष कायद्यामध्ये (एन्शंट आर्कियालॉजिकल साईट्स अँड रिमेंन्स ॲक्ट-१९५८) बदल करण्यात आल्याने राष्ट्रीय स्मारके प्राधिकरणाकडून (नॅशनल मॉन्युमेंट्स ॲथॉरिटी) मान्यता घेणे बंधनकारक झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात पंतप्रधानांना पत्रही पाठविले होते. मुख्यमंत्र्यांसोबत केंद्रीय सचिवांशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने केंद्रीय सांस्कृतिक सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. त्यानुसार रायगडवरील राज्याभिषेकासाठी परवानगी देण्यात आल्याचे राज्य शासनाला तत्काळ कळविण्यात आले.

--------

## चार वर्षात ९८.६९ टक्के अर्ज निकाली माहितीच्या अधिकारांतर्गत महाराष्ट्राची भरीव कामगिरी

**- मुख्यमंत्री**

मुंबई, दि. २ : माहितीच्या अधिकारांतर्गत गेल्या ४ वर्षात एकूण १२ लाख ९६ हजार ३९१ अर्ज प्राप्त झाले असून निकाली काढलेल्या अर्जांची संख्या १२ लाख ८९ हजार ३८७ एवढी आहे. निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी ९८.६९ एवढी आहे. आत्तापर्यंत एकूण १२ लाख ३५ हजार ८४७ अर्जांबाबत माहिती देण्यात आली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

सन २००६ मध्ये १ लाख २३ हजार ५७१ अर्ज प्राप्त झाले असून निकाली काढलेल्या अर्जांची संख्या १ लाख १३ हजार ८१ एवढी आहे, तर निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी ९१.५१ एवढी आहे. याच वर्षामध्ये माहिती दिलेल्या अर्जांची संख्या १ लाख ५ हजार ८३१ असून माहिती नाकारलेल्या अर्जांची संख्या ७ हजार २५० एवढी आहे. माहिती नाकारलेल्या अर्जांची टक्केवारी ६.८५ एवढी आहे.

. . .३/-

सन २००७ मध्ये ३ लाख १६ हजार २ अर्ज प्राप्त झाले असून निकाली काढलेल्या अर्जांची संख्या ३ लाख ६ हजार १८५ एवढी आहे. निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी ९६.८९ आहे. याच वर्षामध्ये माहिती दिलेल्या अर्जांची संख्या २ लाख ९३ हजार २९३ असून माहिती नाकारलेल्या अर्जांची संख्या १२ हजार ८९२ एवढी आहे, तर माहिती नाकारलेल्या अर्जांची टक्केवारी ४.३९ इतकी आहे.

सन २००८ मध्ये ४ लाख १६ हजार ९० अर्ज प्राप्त झाले असून निकाली काढलेल्या अर्जांची संख्या ४ लाख १० हजार १६७ एवढी आहे, तर निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी ९८.५८ एवढी आहे. याच वर्षामध्ये माहिती दिलेल्या अर्जांची संख्या ३ लाख ९७ हजार ६६२ असून माहिती नाकारलेल्या अर्जांची संख्या १२ हजार ५०५ एवढी आहे. माहिती नाकारलेल्या अर्जांची टक्केवारी ३.१४ एवढी आहे.

सन २००९ मध्ये ४ लाख ४० हजार ७२८ अर्ज प्राप्त झाले असून निकाली काढलेल्या अर्जांची संख्या ४ लाख ४९ हजार ९५४ एवढी आहे, तर निकाली काढलेल्या अर्जांची टक्केवारी १०२.०९ एवढी आहे. याच वर्षामध्ये माहिती दिलेल्या अर्जांची संख्या ४ लाख ३९ हजार ६१ असून माहिती नाकारलेल्या अर्जांची संख्या १० हजार ८९३ एवढी आहे, तर माहिती नाकारलेल्या अर्जांची टक्केवारी २.४८ एवढी असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

-------------

## अनुज्ञप्त्याच्या विशेषाधिकार शुल्कात वाढ

मुंबई, दि. २ : राज्यात सीएल-१ ( देशी मद्य निर्माणी) पीएलएल (विदेशी मद्य निर्माणी) "आय" अनुज्ञप्ती (डिस्टिलरी) सीएल-३ ( देशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्ती ) व एफएल-२ (विदेशी मद्य किरकोळ विक्री अनुज्ञप्ती) या अनुज्ञप्त्यांमध्ये वाढ करण्याची तरतूद नाही. या अनुज्ञप्त्यांची संख्या न वाढविता या करीता सध्या अस्तित्वात असलेल्या भागीदार घेणे व काढण्याबाबत, अनुज्ञप्ती एका नावावरुन दुसऱ्या नावावर हस्तांतरण करण्यासाठी व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या शुल्कामध्ये पुढीलप्रमाणे वाढ करण्याचे ठरविले आहे.

| **अनुज्ञप्तीचा प्रकार** | | **भागीदार घेणे** | **भागीदार वगळणे** | **हस्तांतरण करणे** | **स्थलांतर करणे** |
|---|---|---|---|---|---|
| सीएल-३ एफएल-२, एफएल-३ | ग्रामीण भाग तालुका व इतर गावे | ३५० % | ५०% | ४००% | १००% |
| सीएल-३ एफएल-२, एफएल-३ | इतर शहरी भाग, जिल्हा मुख्यालये व इतर महानगरपालिका क्षेत्र | ४५० % | ५०% | ५००% | २००% |
| सीएल-३ एफएल-२, एफएल-३ | मुंबई नवी मुंबई, ठाणे, भिवंडी, मिरा-भाईंदर, कल्याण, डोंबिवली, विरार-वसई, पुणे महानगरपाकिा क्षेत्र | ७५० % | ५०% | ८००% | ३००% |
| पीएलएल, पीएल-१ व "आय" अनुज्ञप्ती | राज्यात कोठेही | ४५० % | ५०% | ५००% | १००% |

वरील टक्केवारी अनुज्ञप्ती शुल्काच्या प्रमाणात आहे.

---------